# <u>हमीपत्र (नमुना-अब)</u>

फोटो

मी/आम्ही प्रतिज्ञापूर्वक कथन आणि घोषित करतो की, मी/ आम्ही मे. ................................................................................ या आस्थापनेचे मालक/ भागीदार/संचालक/विश्वस्थ/कर्ता/कब्जेदार/प्रवर्तक आहे/आहोत व........ (व्यवसायाच्या ठिकाणचा पत्ता)........................................................................................ ................................................................................ या ठिकाणी व दि......................... रोजीपासून व्यवसाय सुरु केलेला आहे. (पृष्ठ क्र. )

मी/आम्ही माझ्या/आमच्या ओळखीचा पुरावा म्हणून पॅन कार्ड/आधार कार्ड/टिन क्र.,सादर केले आहे.

मी/आम्ही सादर करतो की, व्यवसाय चालविताना ............... इतके कामगार कामावार ठेवले आहेत आणि शासनाने निर्धारित केल्यानुसार शुल्क अदा करु.

मी/आम्ही सादर करतो की, भारतात अस्तित्वात असलेल्या कायद्यांनुसार बेकायदेशीर असलेली कोणतीही अनुचित क्रियाकल्प वा व्यवसाय करीत नाही असे आश्वासन देतो.

मी/आम्ही घोषित करतो की, कोणत्याही सक्षम प्राधिका-याने कोणत्याही कायद्यानुसार वा आदेशानुसार मनाई केलेल्या परिसरात/जागेवर माझा/आम्ही व्यवसाय सुरु करित असलेली जागा/चालू असलेला व्यवसाय त्या जागेवर अस्तित्वात नाही. तसेच आस्थापना असलेल्या वास्तूचा न्यायालयात कोणताही दावा प्रलंबित नाही.

मला/आम्हाला याची पूर्ण जाणीव आहे की, दुकाने व आस्थापना नोंदणीप्रमाणपत्र हे केवळ नोंदणी दाखला असून परवाना नाही आणि ते देण्यात आल्यामुळे ज्या वास्तुत ती आस्थापना स्थित आहे त्या वास्तुत कोणतीही वैधता बहाल होत नसून या दाखल्यामुळे ती वास्तू ज्या मध्ये आहे ते दुकान/आस्थापना अस्तित्वात आहेत त्या दिनांक व वेळेस अस्तित्वात असल्या संबंधात सदर आस्थापना नियोक्त्यास कोणताही हक्क व स्वामीत्व प्राप्त होत नसून उक्त मालमत्तेचा मालकी हक्क/ ताबा/ इतर हक्क अबाधित राहतील. उक्त कागदपत्र/ नोंदणी प्रमाणपत्र जागेच्या कोणत्याही हक्का विषयी दावा करण्यासाठी वापरले जाणार नाही.

मी/आम्ही महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 आणि त्या अंतर्गत नियम यांमधील तरतुदी अंतर्गत कोणत्याही प्राधिका-याने दिलेल्या आदेशास बांधील आहोत.

मी/आम्ही महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 1948 आणि त्या अंतर्गत नियम यांमधील तरतुदी अंतर्गत आमची आस्थापना नोंदणीकृत करताना महानगरपालिका किंवा मा. महानगरपालिका आयुक्त हे अंतिम निर्णय अधिकारी असतील.

मी/आम्ही याद्वारे जाहीर करतो की, सदर अर्जामध्ये दिलेली सविस्तर माहिती आणि विवरण मला/आम्हाला ज्ञात असल्यानुसार व माझ्या/आमच्या विश्वासानुसार सत्य असून आपल्यापासून कोणतीही माहिती दडवून/लपवून ठेवलेली नाही. तसेच सोबत जोडलेले कागदपत्र मी/आम्ही स्वत: साक्षांकित केलेले आहेत.

मला/आम्हाला याची पूर्ण जाणीव आहे की, अर्जामध्ये दिलेली माहिती जर असत्य अथवा चुकीची अथवा दिशाभूल करणारी असेल वा विपर्यास करुन मिळविलेले असल्यास सदर नोंदणी प्रमाणपत्र रद्द होईल आणि मी/आम्ही कोणत्याही कायदेशीर कारवाईस अथवा कायद्यामध्ये नमूद इतर कारवाईस वा इतर परिणामांस वा त्यानुसार जी कारवाई समर्थनीय असेल त्यास पात्र राहीन/राहू.

दिनांक-

स्थळ-

अर्जदाराची स्वाक्षरी